


# हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४




■ वर्ष ७५ वे/अंक २०३ वा ■ ■ अमरावती,बुधवार,दिनांक १२ मार्च २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २७ फाल्गुन १९४६ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




## नरेंद्र मोदींना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान



मॉरिशस दि. ११ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पीएम मोदी सध्या मॉरिशसच्या दौऱ्यावर आहेत. यादरम्यान तेथील पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मंगळवारी(११ मार्च) पंतप्रधान मोदींचा मॉरिशसच्या सर्वोच्च 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. मॉरिशसचा सर्वोच्च सन्मान मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय ठरले आहेत. पोर्ट लुईस येथे भारतीय समुदायाच्या एका कार्यक्रमात रामगुलाम यांनी ही घोषणा केली.

पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर गेले आहेत. यादरम्यान त्यांनी मॉरिशसचे अध्यक्ष धरमबीर गोखुळ यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मॉरिशसच्या राष्ट्रपतींसमोर अनेक गोष्टी मांडल्या, ज्यात महाकुंभातील संगम पाणी आणि सुपर फूड मखाना यांचाही समावेश आहे. याशिवाय गोखुळ यांच्या पत्नी वृंदा गोखुळ यांना पंतप्रधानांनी बनारसी सिल्कची साडी भेट दिली आहे.

**द्विपक्षीय संबंधांना चालना देण्यावर चर्चा**

मॉरिशसच्या प्रमुखांची भेट घेतल्यानंतर पीएम मोदींनी द वर लिहिले, 'राष्ट्रपती धरमबीर गोखुळ यांच्यासोबत खूप चांगली *(उर्वरित पान २ वर)*

## रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत भोंगे बंद राहणार : मुख्यमंत्री

मुंबई दि. ११ : प्रार्थनास्थळे आणि इतर ठिकाणी असलेल्या भोंग्याबाबत सरकारने नियमावली तयार केलीय. नियमबाह्या आवाज करणाऱ्या भोंग्यावर आता नियमानुसार कारवाई केली



जाणार आहे. आज विधानसभेत झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात संबंधित पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांवर याबाबत जबाबदारी देण्यात आलीय. जर पोलीस निरीक्षकांनी कारवाई केली नाही तर त्यांच्यावरच कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिलाय.

राज्यातील भोंग्यांबाबत नियमावली आता लागू होणार आहे,अशी अपेक्षा व्यक्त केली जातेय. आमदार देवयानी फरांदेंनी राज्यातील भोंग्यांसंदर्भात प्रश्न विधानसभेत उपस्थित केला. भोंग्यावर कारवाई केली जाणार का, असा सवाल फरांदे यांनी केला. त्यावर आपल्याला समाधानकारक उत्तर मिळालं नसल्याचं फरांदे म्हणाल्या.

भोंगा हा कुठल्याही धार्मिक भावनेशी निगडित नाहीये. त्यामुळे ध्वनी प्रदूषण होतं असतं. भोंगे बंद करण्यासाठी पत्र दिले होते. पण तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारने तेव्हा कारवाई केली नाही. पण दुसरीकडे मुख्यमंत्री *(उर्वरित पान २ वर)*

## विधानपरिषदेसाठी भाजपची तीन नावे ठरली

मुंबई दि. ११ : निवडणूक आयोगाने राज्यातील विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून १० मार्चपासून अर्जाला सुरुवात झाली आहे. विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे आपल्या आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर महायुतीमधील आमदारांच्या जागांवर कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपासह सध्या शिवसेनेत आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये या जागांसाठी जोरदार लॉबिंग सुरू असून २७ मार्चला या पाच जागांसाठी मतदान होणार आहे. त्यात, भाजपच्या ३ आणि शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार *(उर्वरित पान २ वर)*

## राज्य सरकारची 'आनंदाचा शिधा' योजना बंद

मुंबई दि. ११ : राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामध्ये सुप्त संघर्ष असल्याच्या चर्चा सुरू असतानाच एक महत्त्वाची बातमी समोर आली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी सुरू केलेल्या आनंदाचा शिधा या योजनेला अर्थसंकल्पात निधीच दिला नसल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे ही योजना बंद झाल्याचं स्पष्ट झालं आहे. या आधी शिंदेंनी सुरू केलेली ज्येष्ठ नागरिकांच्या तीर्थाटन योजनेलाही निधी दिला नाही. शिवभोजन थाळी योजनेचीही तीच स्थिती आहे. त्यामुळे या योजना कागदोपत्री दिसत असल्या तरी त्यासाठी एक रुपयाचाही निधी उपलब्ध नाही.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक योजना सुरू केल्या. त्या योजनांना आता स्थगिती देण्याचं काम फडणवीस करत असल्याचा आरोप विरोधकांकडून नेहमीच केला जात आहे. एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या रकमेतही वाढ करण्यात आली नाही.

सणासुदींच्या निमित्ताने राज्यातील *(उर्वरित पान २ वर)*

## ५० लाख लाडक्या बहिणी योजनेतून कमी होणार : भास्कर जाधव

मुंबई दि. ११ : विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींमुळेच आम्हाला बहुमत मिळाल्याचं महायुतीमधील सर्वच प्रमुख पक्षाचे नेते मान्य करत आहेत. लाडकी बहीण योजनेमुळेचा हा मोठा विजय



झाल्याचं मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री वारंवार सांगत आहेत. मात्र, राज्यात महायुतीचं सरकार आल्यापासून अपात्र लाडक्या बहिणींना कमी करण्यात येत असल्याचं दिसून येत आहे.

विशेष म्हणजे आत्तापर्यंत ९ लाख लाडक्या बहिणी या योजनेसाठी अपात्र ठरल्या असून अद्यापही सरकारकडून स्क्रुटीनी करण्यात येत आहे. त्यातच, यंदाच्या अर्थसंकल्पातून लाडक्या बहिणींना २१०० रुपये मिळण्याची घोषणा होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, अर्थमंत्री अजित पवारांनी सादर केलेल्या बजेटनुसार लाडक्या बहिणींना कुठलीही वाढ मिळणार नाही. याउलट गतवर्षीच्या तुलनेत यंदा लाडकी बहिण योजनेसाठीच्या आर्थिक तरतुदीमध्ये कपात झाल्याचं पाहायला मिळत आहे. त्यावरुन, शिवसेना उबाठा आमदार भास्कर जाधव यांनी वेगळच गणित मांडलं आहे. तसेच, ५० लाख लाडक्या बहिणी योजनेतून अपात्र होतील, असा दावा त्यांनी केलाय.

अर्थमंत्री *(पान २ वर)*

## गृहनिर्माण सोसायट्यांच्या गाळ्यात दारु दुकान सुरु करण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' बंधनकारक : अजित पवार

मुंबई दि. ११ : राज्यात गृहनिर्माण सोसायट्यांच्या व्यावसायिक गाळ्यात बियर किंवा दारुचे दुकान सुरु करायचे असेल तर यापुढे संबंधित सोसायटीचे 'ना हरकत प्रमाणपत्र' बंधनकारक राहील. सोसायटीच्या 'ना हरकत प्रमाणपत्रा'शिवाय राज्यात नवीन बियर शॉपी किंवा दारु दुकान सुरु करता येणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत जाहीर केली. अजित पवार यांच्या घोषणेमुळे गृहनिर्माण सोसायट्यांमधील वातावरण कलहमुक्त राहण्यास, तरुण पिढी व्यसनाधिनतेकडे वळण्यास प्रतिबंध होणार आहे. कायदा-सुव्यवस्था सुधारण्यास मदत होणार आहे.




राज्यात दारुबंदीच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी हीच शासनाची भूमिका

महापालिका वार्डमध्ये मद्यविक्रीचे दुकान बंद करायचे असेल नियमानुसार आलेल्या प्रस्तावावर झालेल्या एकूण मतदानापैकी ७५ टक्के मतदान ज्या बाजूने होईल त्या बाजूने निर्णय होईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्या या घोषणेचे समाजाच्या सर्व थरातून स्वागत होत आहे. राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये बियर आणि दारु दुकानांना परवानगी दिली जात असल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचा मुद्दा भाजप आमदार महेश लांडगे आणि आमदार राहूल कूल आदी सदस्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला होता. माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही चर्चेत महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, शासनाची भूमिका राज्यात दारुविक्री वाढावी, अशी नसून दारुबंदीच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची आहे. अनेक दशकांपासून *(पान २ वर)*

## नॉन क्रिमिलेअरची मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढणार : अतुल सावे

मुंबई दि. ११ : राज्य सरकारकडून क्रीमिलेअरची मर्यादा वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली असून ही मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यासाठी




शिफारस केली असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज विधानपरिषदेत दिली. विधानपरिषद सदस्य राजेश राठोड यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना इतर मागास बहुजन कल्याण मंत्री सावे बोलत होते. राज्यातील एकनाथ शिंदे सरकारच्या मंत्रिमंडळाने क्रिमिलियरची मर्यादा वाढविण्याचा निर्णय कॅबिनेटमध्ये घेतला होता. त्यानंतर, आता फडणवीस सरकारच्या काळात केंद्राकडे यासंदर्भात शिफारस करण्यात आली आहे.

नॉन क्रिमिलियरची मर्यादा आठ लाखावरून १५ लाख रुपये करण्यासंदर्भात केंद्र सरकारला राज्य सरकार शिफारस करणार असल्याची माहिती यापूर्वीच देण्यात आली होती. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने यासंदर्भातील निर्णय घेतला होता. *(पान २ वर)*

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धमकीने भारत नरमला?

नवी दिल्ली दि. ११ : भारत आणि अमेरिकेत सुरू असलेल्या टॅरिफ वादावर केंद्र सरकारने संसदेत महत्वाची माहिती दिली. लोकसभेत एका प्रश्नाला लेखी उत्तर देताना वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद म्हणाले की, आतापर्यंत अमेरिकेने भारतावर कोणताही परस्पर शुल्क कर लादलेला नाही. भारत आणि अमेरिका एका नवीन व्यापार करारावर चर्चा



करत आहेत, ज्यामध्ये दोन्ही देश आयात शुल्क कमी करण्यावर आणि पुरवठा वाढवण्यावर भर देतील. यामुळे दोन्ही देशांना याचा फायदा होईल.

केंद्रीय मंत्री जितिन प्रसाद यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच म्हटले होते की, भारताने शुल्क कमी करण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प म्हणाले होते की, २ एप्रिल २०२५ पासून अमेरिकेपेक्षा जास्त कर आकारणाऱ्या सर्व देशांवर परस्पर शुल्क *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




नेहरुजी नंतर आता औरंगजेब चांगला पर्याय आहे आपल्याकडे ,सध्याचे प्रॉब्लेम सोडवायला..

## हायजॅक ट्रेनमधील १८२ प्रवासी ओलिस

### २० सैनिकांची हत्या; पाकिस्तान एअर स्ट्राईकच्या तयारीत

इस्लामाबाद दि. ११ : पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात बलुच लिबरेशन आर्मीनं एक ट्रेन हायजॅक केली आहे. बीएलएनं १८२ प्रवाशांना ओलिस ठेवलं आहे. आतापर्यंत २० पाकिस्तानी सैनिक मारल्याचा दावा बीएलएकडून करण्यात आला आहे. याशिवाय एक ड्रोनही पाडण्यात आलं आहे. बीएलए अद्यापही मजबूत स्थितीत असल्यानं पाकिस्तान सरकारची डोकेदुखी वाढली आहे.

ट्रेन हायजॅक केल्यानंतर बीएलएनं शाहबाज सरकारला स्पष्ट इशारा दिला आहे. आमच्याविरोधात लष्करी कारवाई केल्यास सगळ्या ओलिसांना ठार करु, अशी थेट धमकी बीएलएकडून देण्यात आली आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## राज्यसभेत खरगेंच्या 'ठोकेंगे'च्या वक्तव्यावरून गोंधळ; उपसभापतींनी बोलण्यापासून रोखले

नवी दिल्ली दि. ११ : मंगळवारी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या विधानावरून राज्यसभेत प्रचंड गोंधळ झाला. खरंतर, दिग्विजय सिंह बोलत असताना खरगे त्यांच्या आसनावर उभे राहिले.



यावर उपसभापती हरिवंश यांनी त्यांना अडवले. यावर खरगे म्हणाले- ही कोणत्या प्रकारची हुकूमशाही आहे? मी तुम्हाला हात जोडून बोलण्याची परवानगी मागत आहे.

यानंतर हरिवंश म्हणाले की, तुम्ही सकाळीच बोलला आहात. आता बोलण्याची वेळी दिग्विजय सिंह यांची आहे, म्हणून कृपया खाली बसा. यानंतर, खरगे म्हणाले, मी नक्कीच बोलेन, पण तुम्हाला जे काही ठोकायचे आहे ते आम्ही व्यवस्थित ठोकू, आम्ही सरकारलाही ठोकणार. हरिवंश यांनी त्यांच्या विधानावर आक्षेप घेतला. तेव्हा ते म्हणाले की, आम्ही सरकारच्या धोरणांवर प्रहार करण्याबद्दल बोलत आहोत.

खरगे यांच्या विधानावर केंद्रीय मंत्री जेपी नड्डा म्हणाले की, विरोधी पक्षनेत्याकडून खुर्चीसाठी अशी भाषा कोणत्याही स्वरूपात स्वीकार्य नाही. त्यांनी माफी मागितली पाहिजे. त्यांनी उपसभापती हरिवंश यांच्याकडे मागणी केली की असे शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावेत. *(पान २ वर)*













■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम